बिना सहकार नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.
नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९
Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2024-25 /11 दि. 23.10.24.

## सभा वृतांत

दिनांक १३/१०/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या सूचनेनुसार संस्थेच्या पुनर्विकासाबाबत विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्व मुकुंदराव पणशीकर कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र ,सेवा भवन , तळ मजला, सर्वे नंबर १३६,प्लॉट नंबर ३४, एरंडवणे पुणे ४११००४ येते पार पडली. सभेच्या पूर्वसूचनेनुसार एकूण १३४ सभासदांपैकी ५८ सभासद सभेस उपस्थित होते.

या विशेष सर्वसाधारण सभेत सहकार विभागाच्या सौ गलांडे-पाटील अधिकारी उपस्थित होत्या. त्यांनी सभागृहात प्रक्रिये बाबत थोडक्यात माहिती सांगितली.

संस्थेने नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन समिती पीएमसी चे देवेंद्र ढेरे यांनी पुनर्विकासाच्या निविदा उघडण्याच्या कायदेशीर पद्धतीबाबत सर्व सभागृहास सविस्तर कल्पना दिली. या प्रक्रियेसाठी संस्थेच्या सभासदांप्रमाणेच ज्यांनी विविध सहभाग घेतला आहे अशा निविदा धारकांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात हे स्पष्ट केले. कायदयानुसार योग्य ती प्रक्रिया राबून संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्प साठी विकासक यांच्याकडून निविदा मागवण्यात आल्या होत्या एकूण १७ विकसकांनी निविदा अर्ज विकत घेतले होते त्यापैकी १३ विकसक यांनी निविदा ठरवलेल्या मुदती मध्ये संस्थेस सादर केल्या होत्या. एकूण १३ निविदा सादर केलेल्या स्पर्धकांपैकी ६ स्पर्धकांचे प्रतिनिधी सभेस उपस्थित होते.

संस्थेच्या पुनर्विकासासाठी खालील विकसक यांचा निविदा आलेल्या आहेत

१) संचेती स्पेस
२) रावतेकर ग्रुप
३) ओम ग्रुप
४) श्री वेंकटेश बिल्डकॉन
५) फोर्चून डेव्हलपर्स
६) डी & टी प्रोपरटीज
७) मॅजेस्टिक लँड प्रायव्हेट लिमिटेड
८) रुही मंगलम असोसियटस
९) नवलखा कॉन्स्ट्रुक्शन्स
१०) केवल रीअल इस्टेट
११) कुणाल ग्रुप
१२) रविराज रीयालटी
१३) न्यू वल्ड लॅण्डमार्क

सर्व निविदा खुल्या पद्धतीने पारदर्शक रित्या उघडण्यात आल्या. त्याबाबतचा सविस्तर तपशील सभागृहास देण्यात आला. निविदांच्या तांत्रिक आर्थिक व कायदेशीर बाबींचा साकल्याने विचार करून तुलनात्मक तक्ता बनवणे गरजेचे असते, असे श्री डेरे यांनी सांगितले व त्यासाठी किमान दोन ते तीन महिने कालावधी लागेल हे सभागृह स्पष्ट केले.

निविदेतील तपशिलाबाबत काही सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याचे अनुषंगाने श्री डेरे यांनी असा तपशील आत्ता घोषित करणे संयुक्तिक ठरत नाही असे स्पष्ट केले. निविदा सादर करताना निविदा धारकाने निविदेत मांडलेल्या विविध मुद्द्यांचा एकत्रित विचार केल्यानंतर त्याबाबत निर्णय घेणे संयुक्तिक राहते. त्यामुळे याबाबतचा तपशील संपूर्ण अभ्यासांती संस्थेस सादर करण्यात येईल व तो सर्व सभासदांना खुला असेल असे ढेरे यांनी स्पष्ट केले.

संस्थेची वेबसाईट सुरू करणे व ईमेल द्वारे माहिती पुरविणे या मुद्द्याबाबत सभागृहात चर्चा झाली. संस्थेचे अध्यक्ष यांनी संस्थेच्या प्रत्येक सभेचे इतिवृत्त तात्काळ सर्व सभासदांना व्हाट्सअप द्वारे पाठविले जाते हे स्पष्ट केले व त्याबाबत उपस्थित सदस्यांनी समाधान व्यक्त केले. संस्थेच्या वेबसाईट निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात असून अल्प कालावधीत वेबसाईट कार्यान्वित होईल असे अध्यक्षांनी सभागृहास सांगितले. संस्थेची वेबसाईट सुरू झाल्यानंतर सर्व महत्त्वाच्या सभांची इतिवृत्ते व इतर आवश्यक तपशील वेबसाईट द्वारे सर्वांना उपलब्ध होईल तसेच व्हाट्सअप द्वारे पूर्वीप्रमाणेच पाठवला जाईल हे सभागृहास स्पष्ट करण्यात आले.

सोसायटीच्या सर्व महत्त्वाच्या बैठका, विशेष सर्वसाधारण व वार्षिक बैठका यांची इतिवृत्ते सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुप वर तसेच प्रत्येक इमारतीच्या वृत्त फलकावर व सोसायटीच्या मुख्य द्वारापाशी असलेल्या फलकावर नियमितपणे लावण्यात येतात. सदर इतिवृत्त, नोटीस, परिपत्रके इत्यादी सभासदांनी वाचणे अपेक्षित आहे. सोसायटीच्या कमिटीची जशी जबाबदारी आहे तशीच सोसायटीच्या प्रत्येक सभासदाचे सहकार्य देण्याची जबाबदारी आहे असे अध्यक्ष महोदय आहे सभागृह सांगितले व त्यास उपस्थित सदस्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

पुनर्विकास प्रक्रियाबाबत संस्थेतील कोणत्याही सभासदास जी कागदपत्रे पहावयाची आहेत ती सर्वांना उपलब्ध होतील. मात्र त्यासाठी संबंधित सभासदाने संस्थेच्या कार्यकारी मंडळाशी संपर्क साधून वेळ व तारीख निश्चित करून घ्यावी त्या दिवशी सदर कागदपत्रे आपणास पाहण्यास उपलब्ध करून दिली जातील. मात्र, त्याची फोटोकॉपी अथवा झेरॉक्स घेता येणार नाही ही बाब अध्यक्षांनी स्पष्ट केली.

**PS - जे सदस्य ACHS अधिकृत whatsapp ग्रुपवर नाहीत, त्यांना विनंती आहे की त्यांनी बिल्डिंग प्रतिनिधीशी संपर्क साधावा आणि त्यांचा मोबाईल नंबर whatsapp ग्रुपमध्ये जोडावा.**

अर्चनानगर सह. गृहरचना सस्था मर्यादित

सचिव

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८